**ठळक बातम्या**

- जगाच्या कल्याणासाठी बिम्सटेक हे उपयुक्त व्यासपीठ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन/ बिम्सटेक चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेची केली घोषणा
- संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज संस्थगित
- वक्फ (सुधारणा) विधेयक, राज्यसभेतही मंजूर
- प्रख्यात चित्रपट अभिनेता आणि दिग्दर्शक निर्माता मनोज कुमार यांच्या निधनामुळं चित्रपट सृष्टीवर शोककळा/ मान्यवरांनी वाहिली आदरांजली

**आणि**

- १५ वी राष्ट्रीय हॉकी अजिंक्यपद पुरुष गटाची स्पर्धा आजपासून उत्तरप्रदेशात झाशी इथं सुरु होणार

**<><><><><>**

जगाच्या कल्याणासाठी बिम्सटेक हे उपयुक्त व्यासपीठ असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. बँकॉक इथं सहाव्या बिम्सटेक संमेलनात आज ते बोलत होते. बिम्सटेक ही दक्षिण आणि आग्नेय आशियाई देशांची संघटना असून सदस्य देशांमधे सहकार्यासाठी २१ कलमी कार्यक्रम प्रधानमंत्र्यांनी प्रस्तावित केला. बिम्सटेक चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेची घोषणा करुन त्यांनी सांगितलं की त्याची व्यावसायिक बैठक दरवर्षी होईल. आपत्ती व्यवस्थापनातल्या उत्कृष्टेचं केंद्र भारतात स्थापन करण्याची घोषणाही त्यांनी केली. त्यात बिम्सटेक देशातल्या ३०० युवकांना दरवर्षी प्रशिक्षण

दिलं जाईल असं त्यांनी सांगितलं. तसंच दरवर्षी भारतात बिम्सटेक पारंपरिक संगीत उत्सव आयोजित केला जाईल असं ते म्हणाले.

बिम्सटेक परिषदेनिमित्त तिथं आलेले बांगला देशचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनुस यांच्याशी मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली. दोन दिवसांच्या थायलंड दौऱ्यात प्रधानमंत्र्यांनी काल थायलंडच्या प्रधानमंत्री पेतोंगतार्नशिनावात्रा यांच्याशी उभयपक्षी हिताच्या मुद्द्यांवर चर्चा केली.

थायलंडचा दौरा आटोपून प्रधानमंत्री मोदी आज श्रीलंकेला जाणार आहेत. चालू कार्यकाळातली ही त्यांची चौथी श्रीलंका यात्रा आहे.

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहाचं अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं कामकाज आज संस्थगित झालं. ३१ जानेवारी रोजी सुरू झालेल्या या अधिवेशनात ११८ टक्के काम झालं असून १६ विधेयकं पारित  झाल्याचं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात सांगितलं.

वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभेत १४ तास तर  राज्यसभेत १७ तास चर्चा झाल्याचं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजीजू यांनी सांगितलं.  हे विधेयक सरकारने बळजबरीने पारीत करून घेतल्याचा काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी  यांचा आरोप रिजिजू यांनी फेटाळून लावला. सभापती ओम बिर्ला यांनीही हे विधान दुर्दैवी असल्याचं म्हटलं आहे.

त्याआधी अमेरिकेने भारतावर लादलेल्या शुल्कावरून विरोधी पक्षांनी गदारोळ केल्यामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं. सभागृहाचं आजचं कामकाज सुरू होताच काँग्रेस आणि द्रमुकच्या खासदारांनी या मुद्द्यावरून घोषणाबाजी सुरू केली तसंच काही

सदस्य हौद्यात उतरले होते. दुसऱ्या बाजूला वक्फ सुधारणा विधेयक हा संविधानावरील हल्ला असल्याच्या सोनिया गांधी यांच्या वक्तव्यावरून सत्ताधारी खासदारांनी घोषणाबाजी केली आणि गांधी यांनी माफी मागावी अशी मागणी केली.

राज्यसभेचं आजचं कामकाज सुरू झालं तेव्हा पश्चिम बंगालमधल्या शिक्षक भरतीवरून सत्ताधीर खासदारांनी गदारोळ केला. त्यामुळे राज्यसभेच्या अध्यक्षांनी दुपारी बारा वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतरही गोंधळ कायम राहिल्याने कामकाज दुपारी एक वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

वक्फ (सुधारणा) विधेयक, २०२५ काल राज्यसभेत मंजूर करण्यात आलं. सुमारे १२ तासांच्या चर्चेनंतर १२८ सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूनं, तर, ९५ सदस्यांनी या विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. हे विधेयक लोकसभेत आधीच मंजूर झालं आहे.

या विधेयकाचा लाभ केवळ आणि केवळ मुस्लिम समुदायाला होणार असून, वक्फ बोर्डाकडे असलेल्या संपत्ती व्यवस्थापनात बिगर मुस्लिम समुदायाचा हस्तक्षेप असणार नाही, असं अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी चर्चेला उत्तर देताना सांगितलं.

राज्यसभेत काल या विधेयंकावर झालेल्या चर्चेदरम्यान, सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी विधेयकाचं स्वागत केलं तर,विरोधी पक्षांनी विधेयकाविरुद्ध आणि केंद्र सरकारविरुद्ध टीकेचा सूर लावला होता.

संसदेनं मुस्लिम वक्फ रद्द करणे विधेयक, २०२५ लाही मान्यता दिली, ज्याच्या प्रभावामुळे मुस्लिम वक्फ कायदा १९२३ रद्द होतो. हे विधेयकही काल राज्यसभेत मंजूर करण्यात आलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वक्फ सुधारणा विधेयक संमत झाल्याबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. वक्फच्या मालमत्तेचं व्यवसथापन यामुळे पारदर्शी आणि सर्व मुस्लिमाना फायद्याचं ठरेल अशी प्रतिक्रीया त्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

हिंदी चित्रपटसृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक मनोज कुमार यांच्या निधनामुळे चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. मनोज कुमार यांचं आज सकाळी मुंबई इथल्या कोकिलाबेन अंबानी रुग्णालयात निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर उद्या सकाळी अकरा वाजता शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार होणार आहेत.

देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जाणारे मनोज कुमार हे भारत कुमार या टोपणनावानेही ओळखले जात. त्यांचं मूळ नाव हरिकृष्ण गिरी गोस्वामी असं होतं. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७मध्ये तत्कालीन वायव्य सिंध प्रांतातल्या एबटाबाद इथे झाला होता. वो कौन थी, शहीद, हिमालय की गोद में, गुमनाम, पत्थर के सनम, नीलकमल, रोटी कपडा और मकान, क्रांती, पूरब और पश्चिम हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. देशभक्त नायक म्हणून त्यांनी साकारलेल्या रुपेरी पडद्यावरच्या व्यक्तिरेखांमुळे भारतकुमार हे टोपणनाव मिळालं. भारतीय चित्रपटसृष्टीतल्या त्यांच्या योगदानामुळे त्यांना फिल्मफेअर

पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार आणि पद्मश्री सन्मानाने गौरवण्यात आलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. मनोज कुमार यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर अमिट छाप सोडली आहे. त्यांच्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी देशभक्तीपर चित्रपट बनवून भारतीय मूल्यांविषयी अभिमानाची भावना जागृत केली, असं राष्ट्रपती समाजमाध्यमावरच्या आपल्या शोकसंदेशात म्हणाल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. मनोज कुमार हे भारतीय चित्रपटसृष्टीत त्यांच्या देशभक्तीपर व्यक्तिरेखांसाठी ओळखले गेले. त्यांनी आपल्या अभिनय आणि चित्रपट निर्मितीच्या माध्यमातून राष्ट्राभिमानाची भावना सदैव जागृत ठेवली. ही भावना पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देत राहिल, असं प्रधानमंत्री समाजमाध्यमावरच्या आपल्या शोकसंदेशात म्हणाले आहेत.

सरंक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनीही मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. देशभक्तीपर चित्रपट बनवण्यासाठी ते कायम लक्षात राहतील. त्यांचा वारसा त्यांच्या चित्रपटांमधून जिवंत राहील, असं सिंग यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी देखील मनोज कुमार यांच्या निधनाविषयी शोक व्यक्त केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मनोज कुमार यांच्याविषयी शोकभावना व्यक्त केल्या आहे. मनोज कुमार यांनी त्यांच्या चित्रपटांमधून देशभक्तीचं मूल्य रुजवलं. ते खरोखरच भारत कुमार या नावाप्रमाणे जगले,असं फडणवीस आपल्या शोकसंदेशात म्हणाले

आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही मनोज कुमार यांच्या उपकार, रोटी कपडा और मकान आणि क्रांती यांसारख्या चित्रपटांद्वारे त्यांची अढळ राष्ट्रभक्ती प्रतीत होत असल्याची भावना आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांनी आपल्या चित्रपटातून भारताच्या स्वातंत्र्यासाठी शूरवीरांनी दिलेल्या बलिदानाची जाणीव सर्वांना करून दिली, असं पवार आपल्या शोकसंदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

१५ वी राष्ट्रीय हॉकी अजिंक्यपद पुरुष गटाची स्पर्धा आजपासून उत्तरप्रदेशात झाशी इथल्या मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर सुरु होत आहे. मार्चमध्ये झालेल्या महिला वरिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेप्रमाणेच नवीन विभाग आधारित स्वरुपात ही स्पर्धा होईल. यामध्ये अ, ब आणि क अशा तीन विभागांत मिळून ३० संघ सहभागी होणार आहेत. यापैकी ब आणि क विभागाचे सामने आजपासून सुरू होत आहेत. तर अ विभागाचे सामने ८ एप्रिलपासून सुरू होतील. येत्या १५ तारखेपर्यंत स्पर्धा चालेल.

**<><><><><>**

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडीयन्सचा सामना लखनौ सुपर जायंट्स बरोबर लखनौ मधे होणार आहे. संध्याकाळी साडे सातवाजता सामना सुरु होईल. काल झालेल्या साखळी सामन्यात कोलकाता नाइट रायडर्स संघाने, सनरायझर्स हैदराबाद संघाचा ८० धावांनी पराभव केला.

**//<><><><><>//**